वृद्ध स्त्री आणि तिचे डुक्कर

लेखक: पॉल, मराठी: अश्विनी बर्वे








वृद्ध स्त्री आणि तिचे डुक्कर

लेखक: पॉल, मराठी: अश्विनी बर्वे





तर एक लहान म्हातारी तिचे घर झाडत होती, तेव्हा तिला एक लहान वाकडे सहा पेन्सचे नाणे आणि उंदराचे घरटे सापडले.
"मी या सहा पेन्सच्या नाण्याचं काय करू?" ती लहान म्हातारी म्हणाली.
"ठीक आहे, मी बाजारात जाऊन माझ्यासाठी एक लहान डुक्कर विकत घेईन."
ती बाजारात गेली आणि तिने तिच्यासाठी एक डुक्कर विकत घेतले.

जेव्हा ती घरी येत होती तेव्हा
कुंपणाच्या आत तिला एक डुक्कर दिसले.
ती त्याला म्हणाली, “कुंपणातून बाहेर ये,
नाहीतर मी घरी जाऊ शकणार नाही.”



“मी नाही येणार,”
डुक्कर म्हणाले.



ती थोडी पुढे गेली तर तिला एक कुत्रा भेटला.

ती कुत्र्याला म्हणाली,
“कुत्र्या कुत्र्या तू डुकराला चाव,
डुक्कर कुंपणाच्या बाहेर् येत नाही,
आणि मी घरी जाऊ शकत नाही.”




पण कुत्र्याने काही केले नाही.



ती आणखीन थोडी पुढे गेली, तिथं तिला एक काठी दिसली.



म्हणून ती त्या काठीला म्हणाली,
“तू त्या कुत्र्याला बडव,
तो डुकराला चावत नाही,
डुक्कर कुंपणाच्या बाहेर येत नाही,
आणि आज मी घरी जाऊ शकत नाही.”




पण काठीने काही केले नाही.



ती थोडी पुढे गेली तेव्हा तिला दिसली आग.

वृद्ध स्त्री त्या आगीला म्हणाली,
“आग आग तू त्या काठीला जाळून टाक,
ती कुत्र्याला बडवत नाही,
कुत्रा डुकराला चावत नाही,
डुक्कर कुंपणाच्या बाहेर येत नाही,
आणि मी घरी जाऊ शकत नाही.”




पण आगीने काही केले नाही.



आणखीन थोडं पुढे गेल्यावर तिला दिसलं पाणी.

ती पाण्याला म्हणाली,
“पाण्या पाण्या तू आगीला विझव,
आग लाकडाला जाळत नाही,
लाकूड कुत्र्याला बडवत नाही,
कुत्रा डुकराला चावत नाही,
आणि डुक्कर कुंपणाच्या बाहेर येत नाही
आणि मी घरी जाऊ शकत नाही.”




पण पाण्याने काही केले नाही.



थोडं पुढे गेल्यावर तिला दिसला बैल.

त्यावेळी ती वृद्ध स्त्री बैलाला म्हणाली,
“बैला बैला तू पाणी पिऊन टाक,
पाणी आगीला विझवत नाही,
आग लाकडाला जाळत नाही,
लाकूड कुत्र्याला बडवत नाही,
कुत्रा डुकराला चावत नाही,
डुक्कर कुंपणाच्या बाहेर येत नाही,
आणि मला घरी जाता येत नाही.”



पण बैलाने काही केले नाही
तो तसाच बसून राहिला.



अजून पुढे गेल्यावर तिला भेटला एक कसाई.

वृद्ध स्त्री कसायाला म्हणाली,
“कसाया कसाया तू बैलाला मार,
बैल पाणी पीत नाही,
पाणी आगीला विझवत नाही,
आग लाकडाला जाळत नाही,
लाकूड कुत्र्याला मारत नाही,
कुत्रा डुकराला चावत नाही,
डुक्कर कुंपणाच्या बाहेर येत नाही,
आणि मी घरी जाऊ शकत नाही.”



पण कसायाने काही केले नाही.



पुढे गेल्यावर तिला दिसली एक दोरी.



वृद्ध स्त्री दोरीला म्हणाली
"तू कसायला बांधून टाक,
तो बैलाला मारत नाही,
बैल पाणी पीत नाही,
पाणी आगीला विझवत नाही,
आग लाकडाला जाळत नाही,
लाकूड कुत्र्याला मारत नाही,
कुत्रा डुकराला चावत नाही,
डुक्कर कुंपणाच्या बाहेर येत नाही,
आणि मी घरी जाऊ शकत नाही."




पण दोरीने काही केले.




पुढे तिला भेटला एक उंदीर.

वृद्ध स्त्री उंदराला म्हणाली,
“उंदरा उंदरा तू दोरी कुरतडून टाक,
दोरी कसायला बांधत नाही,
कसाई बैलाला मारत नाही,
बैल पाणी पीत नाही,
पाणी आगीला विझवत नाही,
आग लाकडाला जाळत नाही,
लाकूड कुत्र्याला मारत नाही,
कुत्रा डुकराला चावत नाही,
डुक्कर कुंपणाच्या बाहेर येत नाही,
आणि मी घरी जाऊ शकत नाही.”



पण उंदीर तिथेच बसून राहिला.



पुढे गेल्यावर तिला
दिसले एक मांजर

वृद्ध स्त्री मांजराला म्हणाली,
“मांजरा मांजरा तू उंदराला खाऊन टाक,
उंदीर दोरी कुरतडत नाही,
दोरी कसायला बांधत नाही,
कसाई बैलाला मारत नाही,
बैल पाणी पीत नाही,
पाणी आगीला विझवत नाही,
आग लाकडाला जाळत नाही,
लाकूड कुत्र्याला मारत नाही,
कुत्रा डुकराला चावत नाही,
डुक्कर कुंपणाच्या बाहेर येत नाही,
आणि मी घरी जाऊ शकत नाही.”

मांजर म्हणाले:

“जर तुम्ही मला एक वाडगाभर दूध दिले तर मी उंदराला खाईन.”

मग वृद्ध स्त्रीने मांजराला एका वाडग्यात दूध दिले.



मांजराने लगेच सगळे

दूध पिऊन टाकले.



मग मांजर उंदीर खायला धावले.



मग उंदीर दोरी कुरतडायला धावले.


दोरी कसायला बांधायला धावली.



कसाई, बैलाला कापायला धावला.



बैल पाणी प्यायला गेला.



मग पाणी, आग विझवायला गेले.




मग आग, लाकूड जाळायला धावली.



मग लाकूड, कुत्र्याला मारायला पळाले.
मग कुत्रा डुक्कराला चावायला गेले.



मग डुक्कराने कुंपणावरून उडी मारली.



आणि मग ती स्त्री घरी पोहचली.